# संगीत मत्स्यगंधा नाटक पुन्हा रंगभूमीवर

## रविवारी शिवाजी मंदिरमध्ये येथे शुभारंभ; गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर, विनोद तावडे यांची उपस्थिती

प्रतिनिधी
मुंबई

मराठी नाट्यसृष्टीच्या संगीत नाटकांच्या इतिहासातील मानाचे पान असलेले वसंत कानिटकर लिखीत संगीत मत्स्यगंधा हे नाटक पुन्हा एकदा रंगभूमीवर दाखल होत आहे. येत्या रविवारी २४ सप्टेंबरला या नाटकाच्या शुभारंभाचा प्रयोग शिवाजी मंदिर येथे दुपारी ३.३० वाजता पार पडणार आहे. यावेळी गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर आणि सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. धि गोवा हिंदू असोसिएशन आणि नाट्यसंपदा कलामंचतर्फे हे नाटक पुन्हा एकदा रंगभूमीवर येणार आहे.

१ मे १९६४ साली धि गोवा हिंदू असोसिएशनतर्फे संगीत मत्स्यगंधा या नाटकाचा पहिला प्रयोग पार पडला होता. या नाटकामध्ये मास्टर दत्taराम, रामदास कामत यांच्या प्रमुख भूमिका या नाटकात होत्या. धि गोवा हिंदू असोसिएशनतर्फे यापूर्वी लेकुरे उदंड जाहली, अखेरचा सवाल अशी काही अजरामर नाटकं रंगभूमीवर आली. पण १९९७ साली काही कारणास्तव धि गोवा हिंदू असोसिएशनचा कलाविभाग बंद पडला. आता तब्बल २० वर्षांनी हा कलाविभाग या नाटकाच्या निमित्ताने पुन्हा सुरू होणार आहे. या पुनरुज्जिवीत नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे या नाटकातील प्रमुख भूमिका नवोदित कलाकार साकारणार आहेत. नचिकेत लेले



आणि केतकी चैतन्य या नवोदित कलाकारांच्या प्रमुख भूमिका या नाटकात असून अमोल कुलकर्णी, शशी गंगावणे, पूजा रायबागी, संजीव तांडेल आणि राहुल मेहेंदळे यांच्याही भूमिका या नाटकात आहेत. या नाटकाचे दिग्दर्शन संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांचे असून सहाय्यक दिग्दर्शन रेणू मिडे यांनी केले आहे. ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांचे संगीत या नाटकाला लाभले आहे. या नाटकाविषयी माहिती देताना नाट्यसंपदा कलामंचचे अनंत पणशीकर यांनी सांगितले की, संगीत नाटक हा प्रकार सध्या बराच दुर्लक्षित आहे. तरुणाईला संगीत नाटकाविषयी फारशी माहितीही नाही. त्यांना संगीत नाटकाविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी संगीत मत्स्यगंधा हे नाटक आम्ही पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहोत, असे पणशीकर यांनी सांगितले. तर दिग्दर्शिका संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी सांगितले की, जवळपास ५ तासाचे नाटक २ तास ४० मिनिटांचे करणे हे आव्हानात्मक होते. संगीत नाटकाचे मी प्रथमच दिग्दर्शन करत आहे. याशिवाय गाजलेल्या नाटकाला पुनरुज्जिवित करण्याची आणि ते यशस्वी करून दाखविण्याची जबाबदारीही माझ्यावर आहे असे संपदा जोगळेकर- कुलकर्णी यांनी सांगितले.

### पारंपरिक नाटकाचे टेक्नोसॅव्ही पाऊल

या नाटकाच्या कलाकार निवडीसाठी व्हॉट्सअ‍ॅपवर ऑडिशन्स घेण्यात आल्या होत्या. कराड, सांगली, रत्नागिरी, गोवा, गुजरात, नांदेड, राजापूर अशा ठिकाणाहून कलाकारांच्या १५० एण्ट्रीज आल्या. यातून ३० जणांची निवड करण्यात आली आणि ज्येष्ठ अभिनेते रामदास कामत तसेच अशोक पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली नाटकासाठी कलाकारांची निवड करण्यात आली. एखाद्या संगीत नाटकासाठी व्हॉट्सअ‍ॅपवरून ऑडिशन्स घेण्याची ही पहिलीच वेळ आहे.